# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21 / 12 / 2022 (बुधवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कन्हान :– दिनांक १०/०५/२०२० चे रात्री २३.१३ वा. दरम्यान फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अप. क्र. २२३/२०२० कलम ३७६(२) (जे) (एन), ३७६(अ)(ब), ५०६ भांदवि. सहकलम ४, ६ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०९/०५/२०२० चे १२.०० वा. रोजी फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही आरोपी नामे– तुळशीराम शामराव कारेमोरे, वय ५३ वर्ष, रा. सावला येसबा कन्हान याच्या किराणा दुकानात सामान घेण्यास गेली असता नमुद आरोपीने पिडीतेला आत बोलावुन चॉकलेट देतो असे आमिष दाखवुन तिच्यावर जबरी संभोग केला.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती. नंदा पाटील, पोलीस स्टेशन केळवद यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २१/१२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. **डी. जे. राठी** यांनी वरील नमुद आरोपीला कलम ९, १० पोक्सो ॲक्ट मध्ये ०७ वर्ष सश्रम कारावास व ५०००/–रू. दंड दंड न भरल्यास ०५ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. शाम खुळे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस शिपाई ब. नं. १४६८ सैफल्लाह अहमद पोस्टे केळवद यांनी मदत केली आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर जलालखेडा येथे दिनांक १९/१२/२०२२ चे २३.३० वा. ते दिनांक २०/१२/२०२२ चे सकाळी ०८.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे– **चंदु उर्फ चंद्रशेखर तुकाराम आलोने वय २८ वर्ष रा. जलालखेडा** हा जेवन करून आपल्या रूम मध्ये गेला व सर्व परीवार हा दुसऱ्या रूममध्ये झोपले असता सकाळी मृतकच्या रूम मध्ये त्यास उठविण्यास त्याचे वडील गेले असता त्यास दार वाजवुन आवाज दिला पण तो उठला नाही म्हणुन संदिप याने रूममध्ये पाहिले असता तो घराचे पंख्याला दुपट्टयाने फाशी घेउन लटकलेला दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– तुकाराम विठोबाजी अलोने, वय ५३ वर्ष, रा. जलालखेडा (मृतकचे वडील) यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नायक दिनेश जोगेकर ब. नं. १००६ मो. नं ८०८७४७८२४३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बेला :–** अंतर्गत ०५ किमी मौजा कळमणा येथे दिनांक २०/१२/२०२२ चे १३.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे– कु. पायल विलास पेंदाम, वय २१ वर्ष, रा. कळमणा ता. उमरेड जि. नागपुर** हिने आपल्या राहत्या घरी अज्ञात कारणावरुन गळफास लावुन आत्महत्या केली यापुर्वी सुध्दा मृतक हिने रागाच्या भरात घरगुती कारणावरुन गळफास लावण्याचा प्रयत्न केला होता.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ग. भा. सिंधु विलास पेंदाम, वय ४० वर्ष, रा. कळमणा ता. उमरेड जि. नागपुर (मृतकची आई) यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार ७३५ सत्येंद्र रंगारी हे करीत आहे.

**३) पो.स्टे. रामटेक :–** अंतर्गत दिनांक २०/१२/२०२२ चे १९.०० वा. पुर्वी यातील फिर्यादी हा गोळाफेकची प्रॅक्टीस करून जंगलाच्या मार्गाने मोबाईलचे टार्च लावुन आपल्या घरी जात असताना त्यांना एका झाडावर एक पुरूष व स्त्री अनुक्रमे **मृतक नामे– 1) मयुर गजानन माणुसमारे, वय अंदाजे ३० वर्ष, रा. सांवगी देवळी ता. हिंगणा, जि. नागपुर २) कांचन ज्ञानेश्वर रंधई, वय अंदाजे ३३ वर्ष, रा. सांवगी देवळी ता. हीगंणा, जि. नागपुर** हे टांगलेले दिसले त्यांनी पोलीसांना फोनद्वारे माहीती दिली असता पोलीसांनी घटनास्थळी जावुन दोघांना खाली उतरविले असता ते मरण पावलेले होते.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नायक योगेश शामराव भुरे, वय ३५ वर्ष, रा. पो. स्टे. रामटेक मो. क्र. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर